Date : १७-४-२०१४

शांत निवांत.... एकांत.... रोजच्या धकाधकीच्या जीवनापासून दूर, निसर्गाच्या सानिध्यात... खरचं खूप छान!

राधानगरी गांव सोडल्यानंतर थोड्यात अंतरावर जेव्हा गाडीने डांबरी रस्ता सोडून, लाल मातीच्या मळलेल्या रानवाटे कडे वळण घेतल्यानंतर, वाटलं की, वडाच्या डेरेदार वृक्षाने आम्हां दोघांचं एकांत मध्ये स्वागत केलं आहे. या ठिकाणी आल्यानंतर गाडीतून उतरताक्षणीच एकांतच्या परीसराने मन मोहून टाकलं!

इथल्या बंगल्याची रचना, समोरील निवांत व्हरांडा, लाकडी फर्नीचर, शेणाने सारवलेले आंगण, मस्त हिरवळ, कुजबुजणारी उंच झाडे, पक्षांचा किलबिलाट, झाडाखालील छोटे छोटे कट्टे .... समोरच्या बाजूकडील झोपड्यांच्या रचनेची कुटीर, रात्रीची प्रकाशयोजनेसारं कसं ... मनाला लुभावणारं ... आपलेपणा वाढवणारं ... निसर्गाची ओढ वाढवणार ...

आणि हो .. इथले इतिहासकालिन फोटो पाहिल्यानंतर शिकारींची थरारकता जाणवली.

बंगल्यातील हॉल, बेडरुममधील व्यवस्था सुंदरच! सर्वत्र नीटनेटकेपणा स्वच्छता, अंतर्गत सजावटीचा वेगळा टच ..!

आणखी एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय एकांत बिषयीचं मत पूर्ण होऊ शकत नाही ते म्हणजे इथलं जेवण ... सुरेशदादा आणि वहीनी यांचं पुन्हा पुन्हा खावसं वाटणारं .... सियेला पाणी सुटणारं .. जेवण व नाष्टा .. खरच अप्रतीम ...

इथल्या सागरदादाची नम्रता .. सुरेशदादा व वहीनींची आपुलकी या ठिकाणी परत परत यायला लावणारी आहे.

आणि सर्वात महत्वाचे म्हणजे .... आम्हां सर्वांची काळजी घेणारं ... आपलं माणस म्हणजे ... गौरीताई ..! बुकींग केल्यापासून अगदी जाईपर्यंत ... प्रत्येक गोष्टींची आपुलकीने, आस्थेने चौकशी ... कोणत्याही गोष्टींची कमतरता राहायला नको ... यासाठी धडपड राधायला जरी कोल्हापूरात .. पण मन मात्र एकांतमध्येच ... त्यामुळे आमची एकांतचीओढ भविष्यातही वाढणारच ...... एकंदरीत आमचा वेळ खूपच मजेत ... पुढील दिवसांचा उत्साह वाढविणारा गेला ..!

★ एकांत प्रेमी ★

ईजि. सुनिल माळी व सौ. वैशाली माळी
तासगांव (जि. सांगली).